12 DEC 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय भाषा एकतेचे प्रतीक : कुलसचिव डॉ. शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारतीय भाषा हे एकतेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. भारतीय भाषा उत्सव व भारतीय भाषा दिवसानिमित्त वि. स. खांडेकर भवन येथे मराठी व हिंदी अधिविभागांतर्फे आयोजित पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

ते म्हणाले, भारत विविधतेने नटलेला देश आहे. येथे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक एकता नांदते.

भाषांमुळे भारत एकसंध आहे. देशाची एकसंधता टिकविण्यासाठी सर्व भाषांना आपलेसे केले पाहिजे. याच धर्तीवर भारतीय भाषांचा उत्सव साजरा करून सर्व एकसंध होऊया, असे आवाहन कुलसचिव डॉ. शिंदे यांनी केले. मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. हिंदी विभागाचे प्रभारी डॉ. ए. एम. सरवदे यांनी आभार मानले.

भारतीय भाषा उत्सव सांस्कृतिक कार्यक्रम झाला. भारतीय भाषा उत्सवाच्या निमित्ताने निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन केले होते. यात मोनिका कुंभार- प्रथम क्रमांक (वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव), साक्षी शिर्के - द्वितीय (डी. आर. माने महाविद्यालय, कागल), प्रतिभा दुंडगे- तृतीय (देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर), निकिता मोहिते- उत्तेजनार्थ (एस. जी. एम, कराड) व अमृत जोगम (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर) यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविले. यावेळी डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. नीला जोशी आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : निबंध लेखन स्पर्धेतील विजेत्यांसमवेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. ए. एम. सरवदे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2023
पुण्यनगरी

# भारतीय भाषा हे एकतेचे प्रतीक : कुलसचिव डॉ. शिंदे

कोल्हापूर : प्रतिनिधी

भारत विविधतेने नटलेला देश आहे. येथे सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक एकता नांदते. भारतीय भाषा हे एकतेचे प्रतीक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

भारतीय भाषा उत्सव व भारतीय भाषा दिवसानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या वि. स. खांडेकर भवन येथे मराठी व हिंदी अधिविभागाच्या वतीने आयोजित पारितोषिक वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले. आभार हिंदी विभागाचे प्रभारी डॉ. ए. एम. सरवदे यांनी मानले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. यावेळी डॉ. शिवकुमार सोनाळकर, डॉ. प्रकाश दुकळे, डॉ. नीला जोशी आदी उपस्थित होते.

भारतीय भाषा उत्सवाच्या निमित्ताने आयोजित निबंध लेखन स्पर्धेतील विजेते अनुक्रमे, मोनिका कुंभार (वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव), साक्षी शिर्के (डी. आर. माने महाविद्यालय, कागल), प्रतिभा दुंडगे (देवचंद महाविद्यालय, अर्जुननगर), उत्तेजनार्थ : निकिता मोहिते (एसजीएम, कराड), अमृत जोगम (विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर).

12 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## संशोधन महोत्सवात २५७ प्रकल्पांचे सादरीकरण : कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग

# विवेकानंद महाविद्यालयाला 'आविष्कार'चे विजेतेपद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद महाविद्यालयाने पटकविले. त्यात कोल्हापुरातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी २५७ संशोधन प्रकल्पांचे सादरीकरण केले.

येथील विवेकानंद महाविद्यालयातील शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवनात विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्ष पुरस्कृत कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. 'आविष्कार संशोधन महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळत आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेले नावीन्यपूर्ण संशोधन नक्कीच समाजाला दिशा देणारे असल्याचे डॉ. कुंभार यांनी सांगितले.

यावेळी विद्यापीठ समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे, डॉ. श्रुती जोशी उपस्थित होते. दरम्यान, या महोत्सवात स्मार्ट डस्टबिन, सलाईन लेव्हल वायरलेस मॉनटेअरिंग, स्मार्ट रॉकिंग चेअर, टाकाऊ साहित्यापासून ताक ढवळणारी तांत्रिक रवी, आदी प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. महोत्सवातील विविध प्रकारातील पहिल्या दोन क्रमांकाचे विजेते विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात सहभागी होतील. आविष्कार संशोधन महोत्सवाच्या समन्वयक डॉ. सुमैय्या इनामदार यांनी प्रास्ताविक केले. अस्मिता तपासे यांनी आभार मानले. सुप्रिया पाटील, सुनील भोसले यांनी सूत्रसंचालन केले.






कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील डॉ. बापूजी साळुंखे स्मृती भवनात आज शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सव रंगला. त्यात विद्यार्थ्यांनी विविध प्रकल्प सादर केले. दुसऱ्या छायाचित्रात, शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद महाविद्यालयाने पटकविले. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

### महोत्सवातील विजेते

मानव्यविद्या, भाषा, कला प्रकार (विजेत्यांची नावे अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय अशी): रिया घोपेश्वरकर (राजाराम कॉलेज), बागवान मिसबाह इनायतुल्ला (आजरा महाविद्यालय), अक्षता घराळ (विवेकानंद महाविद्यालय). वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा सुशासनः रसिका गायकवाड (विवेकानंद महाविद्यालय), गीता छाब्रिया (डीआरके कॉमर्स कॉलेज), कादंबरी किल्लेदार (यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय). विज्ञानः अन्सारी महमदमुनिफ इम्तियाज अहमद (न्यू कॉलेज), लक्ष्मी जाधव (देवचंद कॉलेज), विदुल जोशी (न्यू कॉलेज). कृषी आणि प्राणीशास्त्रः सिमीन बागवान (कमला कॉलेज), ऋषिकेश दळवी (डॉ. घाळी कॉलेज), श्रद्धा तेरदाळे (जयसिंगपूर कॉलेज). अभियांत्रिकी- समीक्षा भोसले (न्यू कॉलेज), अभिषेक उपाध्ये (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग), नम्रता काशिद (न्यू कॉलेज). वैद्यकशास्त्र आणि औषधनिर्माणशास्त्रः शिवम माने (अशोकराव माने कॉलेज ऑफ फार्मसी), मोहमंद पटवेगार (भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ फार्मसी), सानिका साळोखे (तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी).

12 DEC 2023 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘आविष्कार’मुळे संशोधनवृत्तीला चालना

## प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार; शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन महोत्सव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संशोधन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून त्याचा विकास हाच सर्व मानवजातीच्या विकासाचा स्रोत आहे. माहिती तंत्रज्ञान युगात संशोधनाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत आविष्कार संशोधन महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळेल, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले.

विवेकानंद कॉलेज आयोजित शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्ष पुरस्कृत कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या (महाविद्यालयीन गट) उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास आविष्कार संशोधन महोत्सवाचे विद्यापीठ समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे, आय.क्यु.ए.सी.समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित होत्या. आविष्कार संशोधन महोत्सवात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील २५७ विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प सादर केले. आविष्कार संशोधन महोत्सवाच्या समन्वयक डॉ. सुमैय्या इनामदार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अस्मिता तपासे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुप्रिया पाटील, डॉ. सुनील भोसले यांनी आभार मानले.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेजला देताना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. डी. एच. दगडे आदी.

शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेजला मिळाले. महोत्सवात मानव्यविद्या, भाषा, कला या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक राजाराम कॉलेजची रिया धोपेश्वरकर तर व्दितीय क्रमांक आजरा महाविद्यालयाची मिसबाह बागवान आणि तिसरा क्रमांक विवेकानंद कॉलेजच्या अक्षता शिवाजी घराळ यांना मिळाला.

वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा सुशासन प्रकारात प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेजच्या रसिका गायकवाड यांना मिळाला. डी.आर.के.कॉमर्स कॉलेजच्या गीता छाब्रिया (व्दितीय क्रमांक), यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाच्या कादंबरी किल्लेदार कादंबरी (तृतीय क्रमांक) मिळवला. विज्ञान कलाप्रकारात न्यू कॉलेजच्या महमदमुनिफ अन्सारी (प्रथम क्रमांक), देवचंद कॉलेजची लक्ष्मी जाधव (व्दितीय), न्यू कॉलेजच्या विदुल जोशी (तृतीय) क्रमांक मिळाला. प्रत्येक प्रकारातील पहिले दोन विजेते विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवात सहभागी होतील. यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

12 DEC 2023 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार संशोधन महोत्सवातून संशोधनवृत्तीला चालना

प्रतिनिधी
कोल्हापूर

संशोधन ही सातत्याने चालणारी प्रक्रिया असून त्याचा विकास हाच सर्व मानवजातीच्या विकासाचा स्रोत आहे. माहिती तंत्रज्ञान युगात संशोधनाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत आविष्कार संशोधन महोत्सवामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधनवृत्तीला चालना मिळत आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी केले.

विवेकानंद कॉलेज आयोजित शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास कक्ष पुरस्कृत कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाच्या (महाविद्यालयीन गट) उदघाटनप्रसंगी बोलत होते. आविष्कार संशोधन महोत्सवाचे विद्यापीठ समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, डॉ. आर. एच.अतिग्रे, डॉ. श्रुती जोशी हे उपस्थित होते. आविष्कार संशोधन महोत्सवाचे कोल्हापूर जिल्हा समन्वयक डॉ. आर. एच. अतिग्रे यांनी स्पर्धेच्या नियमांची माहिती दिली. २५७ विद्यार्थ्यांनी आपले संशोधन प्रकल्प सादर केले होते.

शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांना मिळाले. या महोत्सवात मानव्यविद्या, भाषा, कला: प्रथम क्रमांक राजाराम कॉलेजची रिया थोपेश्वरकर, व्दितीय क्रमांक आजरा महाविद्यालयाची मिसवाह बागवान तर तिसरा क्रमांक विवेकानंद कॉलेजच्या अक्षता घराळ यांना मिळाला. वाणिज्य, व्यवस्थापन आणि कायदा सुशासन: प्रथम क्रमांक विवेकानंद कॉलेजची रसिका गायकवाड, व्दितीय क्रमांक कॉमर्स कॉलेजची गीता छाब्रिया तर तृतीय क्रमांक यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयाची कादंबरी किल्लेदार यांना मिळाला.

विज्ञान: प्रथम क्रमांक न्यू कॉलेजची महमदमुनिफ अन्सारी, व्दितीय क्रमांक देवचंद कॉलेजच्या



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर जिल्हास्तरीय आविष्कार संशोधन महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद स्विकारताना विवेकानंद कॉलेजचे विद्यार्थी.

- प्राचार्य आर. आर. कुंभार यांचे प्रतिपादन
- सर्वसाधारण विजेतेपद विवेकानंद कॉलेजकडे

लक्ष्मी जाधव तर तृतीय क्रमांक न्यू कॉलेजचा विदुल जोशी यांना मिळाला. कृषी आणि प्राणीशास्त्र: प्रथम क्रमांक कमला कॉलेजची सिमीन बागवान, व्दितीय क्रमांक डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लजच्या ऋषिकेश दळवी तर तृतीय क्रमांक जयसिंगपूर कॉलेजची श्रध्दा तेरदाळे यांना मिळाला. अभियांत्रिकी : प्रथम क्रमांक न्यू कॉलेजची समिक्षा भोसले, व्दितीय क्रमांक तात्यासाहेब कोरे इंजिनिअरींग, वारणानगरचा अभिषेक उपाध्ये,तृतीय क्रमांक विवेकानंदची नम्रता काशिद यांना मिळाला.

12 DEC 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# भौतिकशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. आर. जी. सोनकवडे

## डॉ. के. वाय. राजपुरे यांनी डॉ. सोनकवडे यांच्याकडे सुपूर्द केला कार्यभार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुखपदी डॉ. आर. जी. सोनकवडे यांची नियुक्ती करण्यात आली. मावळते विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांच्याकडून सोमवारी डॉ. सोनकवडे यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांच्या या नियुक्तीबद्दल देश-विदेशातील माजी विद्यार्थ्यांसह शिक्षण क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

भौतिकशास्त्र विभाग हा विद्यापीठातील संशोधन आणि प्रशासनामध्ये अग्रगण्य विभाग आहे. आत्तापर्यंतचा विभागाचा गौरव आणि कीर्ती याला साजेसे काम करून विभागाची प्रतिष्ठा वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे डॉ. सोनकवडे यांनी सांगितले. याआधी त्यांनी केंद्रीय विद्यापीठ, इन्स्टिटयूट ऑफ नॅशनल इम्पोर्टन्स, आणि राज्य विद्यापीठात काम केले आहे. विद्यापीठातील सैफ-सीएफसी विभागात त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. सैफ-सीएफसीच्या कामासह या निवडीसाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रोत्साहन लाभले. कोरिया, जर्मनी, ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी, लंडन आणि ऑस्ट्रेलिया युनिव्हर्सिटीत संशोधन करणाऱ्या विभागातील माजी विद्यार्थ्यांनी डॉ. सोनकवडे यांना शुभेच्छा दिल्या.



**कोल्हापूर - शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुख पदाचा कार्यभार डॉ. आर. जी. सोनकवडे यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. के. वाय. राजपुरे.**

### भौतिकशास्त्र विभागाची प्रतिष्ठा वाढवणार

भौतिकशास्त्र विभागासाठी शासनाकडून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करणार असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. पीआईएफसीमधील सर्व उपकरणे सुस्थितीत आणणे आणि ती आईस्टेम या डीएसटीच्या पोर्टलला ऑनलाईन पद्धतीने जोडून उपकरणांचा महसूल वाढवण्याकडे माझा कल राहील. आत्तापर्यंत विभागप्रमुखांनी विद्यापीठाला जी प्रतिष्ठा मिळवून दिली ती वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करेन.

**डॉ. आर. जी. सोनकवडे**
(नूतन विभागप्रमुख, भौतिकशास्त्र विभाग)

लोकमत

# आर. जी. सोनकवडे भौतिकशास्त्र विभागाचे नवे प्रमुख

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील



भौतिकशास्त्र विभागाच्या विभागप्रमुखपदी डॉ. प्रा. आर. जी. सोनकवडे यांची निवड झाली. माजी विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांच्याकडून त्यांनी सोमवारी पदभार स्वीकारला. भौतिकशास्त्र विभाग हा विद्यापीठातील संशोधन आणि प्रशासनामध्ये अग्रगण्य आहे. प्रा. सोनकवडे यांच्या केंद्रीय विद्यापीठ, इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पोर्टन्स, आणि राज्य विद्यापीठातील कामाचा अनुभवाचा फायदा विभागाला आणि विद्यापीठाला चांगला होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

विद्यापीठातील सैफ-सीएफसी विभागाला सोनकवडे यांनी नावलौकिक मिळवून दिला आहे. निधी पुरवणाऱ्या संस्थांशी असलेल्या संपर्काचा जास्तीत जास्त फायदा विभागातील संशोधनाला करून देण्यासाठी प्रयत्नशील राहीन, अशी ग्वाही सोनकवडे यांनी निवडीनंतर दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2023
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुखाचा कार्यभार प्रा. आर. जी. सोनकवडे यांच्याकडे माजी विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांनी सुपूर्द केला.

# विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागप्रमुखपदी प्रा. आर. जी. सोनकवडे

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाच्या प्रमुखपदी प्रा. आर. जी. सोनकवडे यांची नियुक्ती झाली आहे. त्यांना सोमवारी या पदाचा कार्यभार स्वीकारला. माजी विभागप्रमुख प्रा. के. वाय. राजपुरे यांनी प्रा. सोनकवडे यांच्याकडे कार्यभार सुपूर्द केला. आतापर्यंत विभागातील सर्व प्राध्यापक आणि विभागप्रमुखांनी विद्यापीठाला जी प्रतिष्ठा मिळवून दिली. ती टिकवण्याचा आणि वृद्धिंगत करण्याचा पूर्ण प्रयत्न करेन, अशी ग्वाही प्रा. सोनकवडे यांनी दिली. विभागातील पीआईएफसीमधील सर्व उपकरणे लवकर सुस्थितीत आणण्यासह आयस्टेम या डीएसटी पोर्टलला ऑनलाईन पद्धतीने जोडून उपकरणांचा महसूल वाढविण्याकडे विशेष लक्ष राहील, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील सैफ-सीएफसी विभागात प्रा. सोनकवडे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

12 DEC 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभातील ग्रंथमहोत्सव शनिवारपासून

## कमला कॉलेजपासून निघणार दिंडी; 'स्वररंग' कार्यक्रम रंगणार

▶ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभानिमित्त बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातर्फे आयोजित ग्रंथमहोत्सव शनिवार (ता. १६) ते सोमवार (ता. १८) दरम्यान होणार आहे. यंदा सलग १७ व्या वर्षी आयोजित या महोत्सवात पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ आदींचा समावेश असणार आहे.

या महोत्सवात शनिवारी सकाळी साडेसात वाजता ग्रंथदिंडी पालखी



मिरवणूक कमला कॉलेज येथून सुरू होईल. त्याचा प्रारंभ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. जनता बझार, राजारामपुरी मुख्य रस्ता, माऊली चौक, सायबर चौक, शिवाजी विद्यापीठ प्रवेशद्वार क्रमांक आठ, राजमाता जिजाऊसाहेब सभागृह असा या ग्रंथदिंडीचा मार्ग राहणार आहे. ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन दहा वाजता होणार आहे. रविवारी सकाळी अकरा वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'स्वररंग' सांस्कृतिक कार्यक्रम होईल. महोत्सवातील सर्व ४० स्टॉल सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत सुरू राहणार आहेत, अशी माहिती महोत्सवाचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी दिली.

### विविध ४० परीक्षा स्थगित

दीक्षान्त समारंभदिनी होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या एकूण ४० परीक्षा स्थगित करण्यात आल्या आहेत. त्यांचे सुधारित वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने उपलब्ध करून दिले आहे. या समारंभाच्या तयारीसाठी रविवारची (ता १७) साप्ताहिक सुटी रद्द करण्यात आली आहे. या दिवशी विद्यापीठातील सर्व विभागांचे काम सुरू राहणार आहे.

12 DEC 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात शनिवारपासून ग्रंथ महोत्सव

## दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षान्त समारंभाचे औचित्य साधून 'ग्रंथ महोत्सव-डिसेंबर २०२३'चे आयोजन दि. १६ ते १८ डिसेंबरदरम्यान केले आहे. यानिमित्त कार्यक्रमात नामवंत भारतीय व परदेशी कंपनीचे प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डेटाबेस पॅकेज, डिजिटल ग्रंथ, उपाहारगृह इत्यादींचे ४० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. ग्रंथ महोत्सवाचे हे १७ वे वर्ष आहे.

यंदाच्या महोत्सवामध्ये दि. १६ रोजी सकाळी ग्रंथ दिंडीचे उद्घाटन कमला कॉलेज येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. त्यानंतर दिंडी कमला कॉलेज - जनता बझार-राजारामपुरी मेन रोड-आईचा पुतळा-सायबर



चौक-शिवाजी विद्यापीठ गेट क्र. ८ -राजमाता जिजाऊसाहेब सभागृह या मार्गावरून निघेल. दि. १७ रोजी सकाळी ११ वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागातर्फे 'स्वररंग' सांस्कृतिक हा कार्यक्रम राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सादर केला जाईल. ग्रंथ महोत्सवातील स्टॉल दि. १६ ते १८ डिसेंबरदरम्यान सकाळी ९ ते रात्री ९ वा.पर्यंत सुरू असणार आहेत.

**विद्यापीठ रविवारीही खुले :** सोमवार, दि. १८ डिसेंबर रोजी होणाऱ्या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १७ रोजी विद्यापीठ कामकाज सुरू राहणार आहे. या दिवशी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभाग सुरू राहणार आहेत, याबाबतचे आदेश कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी काढले आहेत.

### प्रशासनातर्फे जय्यत तयारी

शिवाजी विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) या राष्ट्रीय नियामक संस्थेचे माजी चेअरमन डॉ. एस. एस. मंथा उपस्थित राहणार आहेत. समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्राचे राज्यपाल तथा कुलपती डॉ. रमेश बैस उपस्थित राहणार आहेत. या दीक्षांत समारंभात ४९,४३८ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान केली जाणार आहेत. यामध्ये मुलींची संख्या २७,४७५ इतकी लक्षणीय आहे. प्रशासनातर्फे या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2023
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात शनिवारपासून ग्रंथमहोत्सव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवार १८ डिसेंबर रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठतील बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राच्या वतीने १६ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीला प्रारंभ होणार आहे.

विद्यापीठात ग्रंथदिंडीची सांगता झाल्यानंतर सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. हा कार्यक्रम राजमाता जिजाऊसाहेब सभागृहनजीक दीक्षांत सभा मंडपमध्ये होणार आहे.

रविवार १७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात संगीत व नाट्यशास्त्र विभागाचा 'स्वररंग' सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. हे ग्रंथ महोत्सवातील स्टॉल १६ ते १८ डिसेंबर पर्यंत दररोज सकाळी ९ ते रात्री ९ पर्यंत खरेदीसाठी खुले राहणार आहेत. तरी शिक्षक, विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन ग्रंथमहोत्सवाचे समन्वयक डॉ. डी. बी. सुतार यांनी केले आहे.



- **१६ ते १८ या कालावधीत विविध पुस्तकांचे स्टॉल खुले राहणार**
- **शनिवारी सकाळी ७.३० वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीचे आयोजन**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2023
लोकमत

# शिवाजी विद्यापीठात तीन दिवस 'ग्रंथ महोत्सव'

## दीक्षांत समारंभ : शनिवारी निघणार ग्रंथदिंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : विद्यापीठाच्या ६० व्या दीक्षांत समारंभाचे औचित्य साधत बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या वतीने 'ग्रंथ महोत्सव डिसेंबर २०२३' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. १६ ते १८ डिसेंबर या कालावधीत आयोजित ग्रंथ महोत्सवात भारतीय, परदेशी पुस्तक प्रकाशक, पुस्तक विक्रेते, डिजिटल ग्रंथ व उपाहारगृह, असे ४० स्टॉल असणार आहेत.

शनिवारी सकाळी कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडी निघणार आहे. सकाळी ७:३० वाजता कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते या दिंडीचा प्रारंभ होईल. जनता बझार - राजारामपुरी मेन रोड, शिवाजी विद्यापीठ रोड-बाईचा पुतळा-सायबर चौक- शिवाजी विद्यापीठ गेट क्र. ८ मार्गे विद्यापीठात येईल. याच दिवशी सकाळी १० वा. जिजाऊसाहेब सभागृहात डॉ. शिर्के यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होईल.

### रविवारीही कामकाज

विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवारी होणार असून, या पार्श्वभूमीवर रविवारी विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज सुरु राहील.

12 DEC 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चित्रपटासाठी गोष्ट सांगण्याचे तंत्र आत्मसात करा : नाईक

## शिवाजी विद्यापीठात 'स्क्रिप्ट टू स्क्रीन' कार्यशाळेला प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चित्रपट निर्मिती म्हणजे उघड्या डोळ्यांनी स्वप्ने बघायला शिकवणारी कला आहे. ही कला आत्मसात करायची असेल तर गोष्ट सांगण्याचे तंत्र आत्मसात करावे लागेल, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ निमर्ति, दिग्दर्शक सुनील नाईक यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभाग व पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'स्क्रिप्ट टू स्क्रीन' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी नाईक बोलत होते. डॉ. प्रसाद ठाकूर व डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते. दिग्दर्शक नाईक म्हणाले, कलेचे माहेरघर असणाऱ्या कोल्हापुरातूनच मराठी चित्रपटाची निर्मिती व चित्रपट सृष्टीशी निगडित सेन्सॉरसह अनेक बाबींची सुरुवात झाली. चित्रपट निर्मिती मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणारा एक सक्षम उद्योग आहे. कोणत्याही विषयावरील चित्रपट तयार करण्यासाठी लेखन, निर्मिती, दिग्दर्शन, कॅमेरा साऊंड, संकलन याबाबी आवश्यक असतात.



**कोल्हापूर : विद्यापीठातील स्क्रिप्ट टू स्क्रीन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना दिग्दर्शक सुनील नाईक.**

चित्रपट आणि नाटकाविषयी सखोल माहिती देत त्यांनी उपस्थितांना स्क्रिप्ट देऊन त्यावर अभिनय व चित्रीकरणाचे प्रशिक्षण दिले. स्क्रिप्ट टू स्क्रीन ही कार्यशाळा विद्यार्थ्यांना चित्रपट निर्मितीकडे वळण्याची प्रेरणा देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना नाईक यांनी उत्तरे दिली. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविकातून मास कम्युनिकेशन व पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव अध्यासन केंद्राच्या वतीने सुरू असणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. येत्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठात १२ वी नंतर बी. ए. इन फिल्म मेकिंग हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. प्रसाद ठाकूर यांनी दिग्दर्शक सुनील नाईक यांच्या कार्याचा परिचय करून दिला. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. कार्यशाळेत शंभराहून अधिकजण सहभागी झाले होते. या सर्वांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

लोकसत्ता

# प्रा. डॉ. विपिन वैराट यांचा शोधनिबंध सादर

**वाई:** शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर आणि महात्मा गांधी इन्स्टिट्यूट, मॉरिशस यांच्या वतीने 'भारत मॉरिशस आंतर सांस्कृतिक व राजनैतिक संबंध : कला संस्कृती व साहित्यविषयक चिंतन' या विषयावर चर्चासत्र नुकतेच झाले. यामध्ये शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, वाघोली (ता. कोरेगाव)चे प्रा.डॉ. विपिन वैराट यांनी 'एनवोर्मेन्ट इन अण्णा भाऊ साठे लिटरेचर' या विषयावर शोधनिबंध सादर केला.

चर्चासत्रात महात्मा गांधी इन्स्टिट्यूटच्या मराठी विभाग प्रमुख डॉ. मधुमती कुंजल यांनी मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष डॉ. भरत जाधव यांनी शोधनिबंधाचे कौतुक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2023
तरुण भारत

# विद्यापीठातील प्रशासकीय विभाग रविवारी सुरू राहणार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ सोमवार १८ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यामुळे रविवारची सुट्टी रद्द करून १७ डिसेंबर रोजी विद्यापीठातील सर्व प्रशासकीय विभाग नियमित वेळेत सुरू राहणार आहेत. याची सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

12 DEC 2023
सकाळ

# सारिका शिंदेला बॉक्सिंगमध्ये सुवर्णपदक



सारिका शिंदे

मलकापूर, ता. ११ : येथील प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयाची सारिका रमेश शिंदे हिला आंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळाले. तिची निवड पंजाब येथे होणाऱ्या ऑल इंडिया आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी झाली. तिला प्राचार्य डॉ. टी. एन. घोलप व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.